लोकमत




गडहिंग्लज येथे 'श्री रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम.एल. चौगुले यांच्या हस्ते डॉ. अ. बा. गुणे पुरस्कारप्राप्त डॉ. दिलीप आंबोळे यांचा सत्कार झाला. यावेळी उपाध्यक्ष वासुदेव मायदेव, सर्व संचालक व शाखाध्यक्ष उपस्थित होते.

# 'रवळनाथ' ५० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज देणार : चौगुले

## वार्षिक सभा : गोवा, दिल्ली कार्यक्षेत्रात वाढ

**गडहिंग्लज :** श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या सभासदांना पाल्यांच्या उच्चशिक्षणासाठी ५० लाखांपर्यंत कर्ज देण्यासह संस्थेच्या गोवा व दिल्ली या राज्यांच्या कार्यक्षेत्रवाढीला २५ व्या वार्षिक सभेत मंजुरी मिळाली. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते. गणेश मंगल कार्यालयात ही सभा झाली.

चौगुले म्हणाले, मार्च २०२१ अखेर संस्थेत ३११ कोटींच्या ठेवी तर २१९ कोटींची कर्जे आहेत. १११ कोटींची एकूण गुंतवणूक असून, ५२१ कोटींचा वार्षिक व्यवसाय आहे. निव्वळ नफा एक कोटी ४० लाखांचा असून, सभासदांना नऊ टक्के लाभांश देणार आहोत. याप्रसंगी संस्थापक चौगुले, संचालक [illegible]

### पाच नव्या शाखांना मंजुरी

कर्नाटकातील धारवाडसह सांगली, कऱ्हाड, पुणे व सोलापूर याठिकाणी नवीन शाखा सुरू करण्यास सभेत मंजुरी मिळाली.

पोतदार, विजयकुमार घुगरे, विजय आरबोळे, शंकर देसाई, उमा तोरगल्ली व रेखा पोतदार यांनी मांडलेल्या विषयांना मंजुरी मिळाली.

यावेळी सीईओ दत्तात्रय मायदेव, बोर्ड सेक्रेटरी सागर माने, संचालक सुशांत करोशे, संजय चौगुले, महेश मजती व मीना रिंगणे यांच्यासह शाखाध्यक्ष आनंद मेणसे , विजय हरगुडे , कुमार पाटील , राजाराम पाटील , पुष्पा नेसरीकर , सिद्धेश्वर डिसले उपस्थित होते. उपाध्यक्ष [illegible]

पुढारी

# वयोवृद्धांना मायक्रो एटीएमद्वारे घरपोच सेवा

## रवळनाथ हौसिंग फायनान्सच्या वार्षिक सभेत एम. एल. चौगुले यांची घोषणा

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वयोवृद्ध व आजारी ग्राहकांना सर्व शाखेत मायक्रो एटीएमद्वारे घरपोच सेवा दिली जाईल, अशी घोषणा संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत केली. येथील श्री गणेश मंगल कार्यालयात ही सभा झाली. संस्थेच्या कार्यक्षेत्रात गोवा व दिल्ली या राज्यांचा समावेश करण्याबरोबरच कर्नाटकातील धारवाडसह सांगली, कराड, पुणे व सोलापूर येथे मिळून ५ नव्या शाखा सुरू करण्यासदेखील सभासदांनी मंजुरी दिली.

यावेळी विविध क्षेत्रांतील गुणवंतासह सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. चौगुले यांनी संस्थेत ३११ कोटींच्या ठेवी, २१९ कोटींची कर्ज असून गुंतवणूक ११९ कोटींची तर ५२९ कोटींचा वार्षिक व्यवसाय झाला आहे. १ कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला असून, सभासदांना ९ टक्के लाभांश देण्यात येईल असे स्पष्ट केले.

संचालक महेश मजती यांनी नफा-विभागणी, संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी अंदाजपत्रक, संचालक प्रा. विजयकुमार घुगरे यांनी वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, संचालिका रेखा पोतदार यांनी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक, संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांडील येणे-देणेचे वाचन संचालक प्रा. विजय आरबोळे यांनी केले. संचालिका उमा तोरगल्ली यांनी थकित कर्ज खाते सूट दिलेल्या यादीचे वाचन केले.




**गडहिंग्लज : रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, यावेळी व्यासपीठावर उपस्थित अन्य.**

### ५० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज....

सध्या सभासदांच्या पाल्यांसाठी २५ लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज दिले जाते. परंतु, उच्च शिक्षणाचा खर्च वाढल्यामुळे १० वर्षासाठी ५० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज देण्यास सभेत मंजुरी मिळाली.

संचालक प्रा. किरण पोतदार यांनी नवीन शाखांचा प्रस्ताव मांडला. सभासदांतर्फे काशीनाथ शेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संस्थेचे सर्व संचालक, सर्व शाखा सल्लागार, कर्मचारी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव यांनी विषयपत्रिकेचे तर बोर्ड सेक्रेटरी सागर माने यांनी मागील वार्षिक सभेच्या वृत्तांताचे वाचन केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचलन केले. उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Sep 27, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

सकाळ




गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या वार्षिक सभेत बोलताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. व्यासपीठावर सर्व संचालक.

# गोवा, दिल्ली कार्यक्षेत्राला मंजुरी

## 'रवळनाथ'ची वार्षिक सभा; नव्या पाच शाखांना मान्यता

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. २६ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कार्यक्षेत्रात गोवा व दिल्ली या राज्यांचा समावेश करण्याबरोबरच कर्नाटकातील धारवाडसह सांगली, कऱ्हाड, पुणे, सोलापूर येथे शाखा सुरू करण्यास सभासदांनी २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजुरी दिली. गांधीनगर येथील गणेश मंगल कार्यालयात सभा झाली. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते.

यावेळी चौगुले म्हणाले, ''मार्च २०२१ अखेर संस्थेत ३११ कोटींच्या ठेवी, २१९ कोटींची कर्जे आहेत. गुंतवणूक १११ कोटींची असून ५२९ कोटींचा वार्षिक व्यवहार झाला. एक कोटी ४० लाखांचा निव्वळ नफा झाला. नऊ टक्के लाभांश देण्यात येईल.''

संचालक महेश मजती, डॉ. आर. एस. निळपणकर, विजयकुमार घुगरे, रेखा पोतदार, विजय आरबोळे, उमा तोरगल्ली यांनी विषयांचे वाचन केले. संचालक प्रा. किरण पोतदार यांनी नवीन शाखांचा प्रस्ताव मांडला. काशिनाथ शेट्टी, अनिल पोवार, अन्य सभासदांनी चर्चेत भाग घेतला. पंचाहत्तरी पूर्ण झालेले तसेच निवृत्त सभासद, गुणवंत पाल्यांचा गौरव झाला. डॉ. अ. बा. गुणे अनंतव्रती पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. डी. एस. आंबोळे यांचा सत्कार झाला. उद्दिष्टपूर्तीबद्दल बेळगाव व नेसरी शाखेच्या सल्लागार व शाखाधिकाऱ्यांचा सत्कार झाला. संचालक सुशांत करोशे, डॉ. संजय चौगुले, मीना रिंगणे, शाखाध्यक्ष आनंद मेणसे, सिद्धेश्वर डिसले, आर. बी. पाटील, के. एस. पाटील, विजय हरगुडे, पुष्पा नेसरीकर उपस्थित होते. सीईओ दत्तात्रय मायदेव यांनी विषयपत्रिकेचे तर, बोर्ड सेक्रेटरी सागर माने यांनी मागील सभेचा वृत्तांत वाचला. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव यांनी आभार मानले.

### ५० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज

सभासदांच्या पाल्यांसाठी २५ लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज दिले जाते. परंतु, उच्च शिक्षणाचा खर्च वाढल्याने १० वर्षांसाठी ५० लाखांपर्यंतच्या कर्जास सभेत मंजुरी दिली.

Kolhapur, Main
27/09/2021 Page No. 7

तरुण भारत
सोमवार, २७ सप्टेंबर २०२१

# 'रवळनाथ' सुरु करणार मोबाईल बँकिंग सेवा

## संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची माहिती : रवळनाथ सोसायटीची वार्षिक सभा उत्साहात : नव्या ५ शाखा सुरू करण्यास मान्यता

प्रतिनिधी
गडहिंग्लज

रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीला लवकरच स्वतंत्र आयएफएस्सी सुविधा मिळणार असून मोबाईल बँकींग सेवा सुरु करणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. धारवाड, सांगली, कराड, पुणे व सोलापूर येथे नव्या शाखा सुरु करण्यास सभेने मंजुरी दिली.

रवळनाथ हौसिंग सोसायटीची वार्षिक सभा रविवारी दुपारी पार पडली. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले होते. सुरुवातीस निवृत्त सभासद, विविध परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या सभासदांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. वैद्यकीय अधीक्षक दिलीप आंबोळे यांना अनंतव्रती पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सत्कार झाला.



गडहिंग्लज : रवळनाथ हौसिंग फायनान्स.सोसायटीच्या वार्षिक सभेत बोलताना अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव, सीईओ दत्तात्रय मायदेव यांच्यासह संचालक, शाखा पदाधिकारी.

चौगले म्हणाले, ३१ मार्च अखेर संस्थेत ३११ कोटीच्या ठेवी असून २११ कोटींची कर्जे आहेत. १११ कोटीची गुंतवणूक असून ५२९ कोटींचा वार्षिक व्यवसाय झाला आहे. संस्थेला १ कोटी ४० लाखाचा निव्वळ नफा झाला असून सभासदांना ९ टक्के लाभांश देण्याचे जाहिर केले. सभासदांच्या पाल्यांना २५ लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज दिले जाते. पण उच्च शिक्षणाचा खर्च वाढल्याने १० वर्षांसाठी ५० लाखापर्यंत शैक्षणिक कर्ज देण्यासाठी सभेत मंजूरी दिली.

यावेळी सभासद नोंदणी, ठेव संकलन व कर्ज वितरणाच्या उद्दिष्ट पुर्ततेत शहरी विभागात बेळगाव शाखेने तर ग्रामीण विभागात नेसरी शाखेने प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल शाखा सल्लागार व शाखाधिकाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. संचालक महेश मजती यांनी नफा विभागणी, डॉ. आर. एस. निळपणकर यांनी अंदाजपत्रक, प्रा. विजयकुमार घुगरे यांनी ख्रा परिक्षकाचा अहवाल, रेखा पोतदार नी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक, . विजय आरबोळे यांनी संचालक मंडळ त्यांचे नातेवाईकांकडे येणे कर्ज यादीचे चन, उमा तोरगल्ली यांनी थकीत कर्ज दी सुट दिलेल्या कर्ज यादीचे वाचन, . किरण पोतदार यांनी नविन शाखांचा ताव मांडला, काशिनाथ शेट्टी, अनिल वार यांनी चर्चेत भाग घेतला.

मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय मायदेव यांनी विषय पत्रिकेचे तर सागर माने यांनी मागील वार्षिक सभेच्या वृत्तांताचे वाचन केले. उपाध्यक्ष प्रा. वासुदेव मायदेव यांनी आभार मानले. गौरी बेळगुद्री यांनी सुत्रसंचलन केले. संचालक सुशांत करोशे, संजय चौगुले, मिना रिंगणे, प्राचार्य आनंद मेणसे, प्राचार्य सिध्देश्वर डिसले, प्राचार्य आर. बी. पाटील, प्राचार्य के. एस. पाटील आदी उपस्थित होते.